ISSN No-2031-5063 Vol.1,Issue.V/Nov 2011pp.1-4

Research Paper

भारतातील बालकामगार समस्या : प्रतिबंधात्मक, निर्मूलनार्थ व पुनर्वसनात्मक उपाय

प्रा.डॉ. विभा सावरकर
अर्थशास्त्र विभागप्रमुख
इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय,
अमरावती

प्रस्तावना

बालक ही राष्ट्राची शक्ती व भावी आधारस्तंभ आहे. बालकांचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने त्यांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक, बौध्दिक व सामाजिक क्षमतांचा योग्य प्रकारे विकास घडवून आणणे महत्वाचे असते.दारिद्रयामुळे पालकांना आपल्या पाल्यांना श्रमबाजारात पाठवणे भाग पडते. गरीब कुटुंबातील मुलांना आपल्या कुटुंबाच्या गरजांच्या पूर्तीकरिता आर्थिक हातभार लावावा लागतो बालकामगार ही मूळातच दारिद्रय, अज्ञान, अंधश्रध्दा, शिक्षणाचा अभाव व शिक्षणाच्या अपूऱ्या सोयी, वाढती लोकसंख्या, सध्याची अनाकर्षक शिक्षण व्यवस्था , औद्योगिकरण, मुलांची अर्थार्जनाची मानसिकता, उध्वस्त कुटुंब इ. समस्येतून निर्माण झालेली बिकट सामाजिक समस्या होय. बालमजुर हे सर्वत्र विखुरलेले व असंघटित आहेत. म्हणूनच त्यांच्या सर्व समस्यांचे गांभिर्य जितक्या प्रकर्षाने समाजापुढे यायला हवे तितके ते आलेले नाही.

ज्या कामांमुळे मुलांना शिक्षण व मनोरंजन यासारख्या प्राथमिक गरजांपासून वंचित व्हावे लागते, जे काम मुलांच्या आरोग्याला घातक असते ते काम करणे जेव्हा मुलांना भाग पडते तेव्हा ते बालश्रम होय. त्यात त्यांची पिळवणूक केली जाते.

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेनुसार,आपल्या शारीरिक व मानसिक विकासाला क्षति पाहोचवून 14 वर्ष किंवा त्यापेक्षा कमी वयातच वयस्क व्यक्तीप्रमाणे काम करणाऱ्यांना बालश्रमिक म्हणतात.

प्रस्तुत शोधनिबंधात बालकामगारांच्या प्रश्नांचे स्वरुप लक्षात घेवून बालमजुरी प्रतिबंध व निर्मूलन संदर्भात आतापर्यंत करण्यात आलेल्या प्रयत्नांचा आढावा घेण्यात आला आहे व बालमजुरांच्या पुनर्वसनात्मक विविध योजना व उपाय सुचविण्यात आले आहेत.

अभ्यास विषयाची उद्दिष्टे :

1) भारतातील बालकामगारांचे स्वरुप व प्रमाण अभ्यासणे.
2) बालकामगारांच्या समस्यांचा आढावा घेणे.
3) बालमजुरी प्रतिबंध व निर्मूलनासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.
4) बालमजुरांच्या पुनर्वसनात्मक उपाय सूचविणे.

अध्ययन पध्दती –

प्रस्तुत शोधनिबंध द्वितीयक सामग्रीवर आधारित आहे. द्वितीय तथ्य संकलनासाठी विविध संदर्भ ग्रंथ, शासकीय अहवाल, प्रकाशने, विविध संशोधने, लेख, मासिके,वृत्तपत्रे तसेच बालश्रम (प्रतिबंध आणि नियमन) अधिनियम 1986, 1995 ची बालश्रमिक निती व बालरोजगार कायदा (1938,1979) यांचा आधार घेण्यात आला आहे.

भारतातील बालकामगारांचे स्वरुप व प्रमाण –

बालकामगारांच्या संख्येबाबत बरीच संदिग्धता आहे. याचे कारण वेळोवेळी केल्या जाणाऱ्या जनगणनेत बालकामगारांची वेगळी अशी नोंद करण्यात आलेली नाही. जनगणनेच्या सांकेतिक भाषेत याची काहीं ना काही नोंद आहे, परंतू जनगणना पुस्तिकेत त्याचा स्पष्ट उल्लेख मिळत नाही. तरी पण शासनाच्या म्हणण्याप्रमाणे 1981 ला देशात बालकामगारांची संख्या 1 कोटी 45 लाख होती. 1985 साली बडोद्याच्या 'ऑपरेशन रिसर्च ग्रुपने' केलेल्या पाहणीनुसार ही संख्या 4 कोटी 45 लाखांवर गेलेली आहे. बालकामगारांच्या संख्येबाबत मतमतांतरे आढळतात. सध्या जगातील सर्वात जास्त बालमजुराची संख्या भारत देशात आहे. भारतातील बालमजुरांचे प्रमाण पुढील सारणीवरुन लक्षात येते.

सारणी क.1

भारतातील बालकामगारांचे प्रमाण

(5 ते 14 वयोगट)

वर्ष	1971	1981	1991	2001
बालकामगार (दक्षलक्ष)	10.8	13.6	11.3	12.7

स्त्रोत–भारताची जनगणना

यावरुन भारतातील बालकामगार संख्या वाढत आहे हे दिसून येते. भारतातील काही राज्यांमध्ये बालकामगारांचे प्रमाण जास्त आहे. यावरुन तेथे कायद्यांचा उपयोग होतांना दिसत नाही. बालकामगारांचे जास्त प्रमाण असलेल्या काही राज्यांची स्थिती पुढील सारणीत दर्शविली आहे.

सारणी क.2

जास्त प्रमाण असलेल्या बालकामगारांची राज्यवार विभागणी

अ.क.	राज्य	1971	1981	1991	2001
1.	उत्तरप्रदेश	1326726	1434675	1410086	1927997
2.	आंध्र प्रदेश	1627492	1951312	1661940	1363339
3.	राजस्थान	587389	8,19,605	774199	1262570
4.	बिहार	1059359	1101764	942245	1117500
5.	मध्यप्रदेश	1112319	1698597	1352563	1065259
6.	पश्चिम बंगाल	511443	605263	711691	857087
7.	कर्नाटक	808719	1131530	976247	822615
8.	महाराष्ट्र	988357	1557756	1068418	764075
	एकुण भारत	10753985	13640870	11285349	12666377

स्त्रोतः 1971,1981,1991 व 2001 च्या जनगणनेनुसार

वरील बालकामगारांच्या आकडेवारीवरुन भारतातील बालकामगार समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येते.

1991 च्या शिरगणतीच्या आकडयांवरुन आणि 1999–2000 मधील एन.एस.एस.ओ. च्या 55 व्या फेरीतून महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागातील बालश्रमिकांची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे.

सारणी क.3

महाराष्ट्रातील बालश्रमिक

(5 ते 14 वयोगट)

	1991	1999–2000
ग्रामीण भाग	9,62,562	6,38,826
शहरी भाग	1,05,856	75,953
एकुण	10,68,418	7,14,779

विविध बालकामगार प्रतिबंधक कायद्यांमुळे संघटित क्षेत्रातील बालकामगारांची संख्या कमी झालेली असली तरी असंघटित क्षेत्र कायद्याच्या कक्षेत येत नसल्यामुळे त्यात बालकामगारांची संख्या वाढून त्यांची परिस्थिती अधिकच हलाखीची झालेली आहे.

भारतातील बालकामगारांचे रोजगार क्षेत्र –

भारतामध्ये बालकामगार एकुण 13 रोजगार क्षेत्रात विभागले गेले आहेत.

1) शेती , 2) पशुपालन, 3) वनीकरण, 4) मासेमारी , 5) वृक्षारोपण, 6) खाण व दगडी खाण, 7) निर्माण क्षेत्र, 8) बांधकाम, 9) व्यापार 10) वाहतूक 11) दळणवळण, 12) दुरुस्ती,13) अन्य सेवा.

अर्थार्जनाच्या जवळपास सर्व क्षेत्रात बालकामगार काम करतात. विशेषत शेती, औद्योगिक उत्पादने, गालीचे उत्पादन, आगपेटी, फटाके, अगरबत्ती, दगडी पाटया तयार करणे, भांडी, बीडी तयार करणे इ. हजारो कारखाने आणि मालवाहतूक, हॉटेल्स, दुकाने, वर्कशॉपस्, खाणी, मच्छिमार, हिऱ्यांना पैलू पाडणे, पॉलीश, बांधकाम इ. क्षेत्रात प्रामुख्याने अधिक प्रमाणात बालकामगार आढळून येतात. संघटित क्षेत्रात फार कमी मुले कामात आहेत.

बालकामगारांच्या समस्यांचे स्वरुप व दुष्परिणाम–

बालश्रमिकांना काम करतांना अनेक सामाजिक, आर्थिक, शारीरिक व मानसिक समस्यांचा व दुष्परिणामांचा सामना करावा लागतो. 15 वर्षाखालील मुलांना श्रमाच्या कामात गुंतवणे म्हणजे मूलभूत हक्कांवर गदा आणण्याचा प्रकार होय.

अवयाच्या मानाने जास्त काम, त्यामुळे शारीरिकदृष्टया व मानसिकदृष्टया येणारी दुर्बलता व अशक्तता व त्यामुळे कार्यक्षमतेत घट.

अ शिक्षण व प्रशिक्षणाच्या अभावामुळे उत्पन्न क्षमतेत घट.

अ शिक्षणापासून वंचित. त्यामुळे बौध्दिक विकासाच्या संधीपासून वंचितता.

अ आर्थिक चणचण व कठोर परिश्रम तसेच पुरेशा व योग्य आहाराअभावी होणारे कुपोषण व त्यामुळे अनेक रोगांचे बळी.

अ अशिक्षितपणामुळे आयुष्यभर अकुशल कामगार म्हणून करावे लागणारे काम. त्यामुळे कुटुंबही आर्थिक दृष्टया दुर्बल.

अ राहणीमानाचा निम्न स्तर.

अ मालकांची बालकांप्रती वाईट वागणूक व त्यामुळे मानसिकदृष्टया होणारा विपरीत परिणाम.

अ कमी वेतन, त्यामुळे बालश्रमाची कमी होणारी उत्पादन क्षमता.

अ बालश्रमिकांच्या लवचिकता, शिस्तबध्दता, आज्ञाधारकता व नियमीतता, परिश्रमी व कमी सौंदाशक्तीमुळे मालकांकडून करवून घेतले जाणारे कमी वेतनात अधिक परिश्रम.

अ विविध उद्योगांमध्ये विखुरलेले, त्यामुळे संघटितपणाचा अभाव, त्यामुळे न्याय्य मागण्या पूर्ण करण्यासाठी आवाज उठवण्यास असमर्थ.

अ कामाच्या ठिकाणी जाण्यास वाहनांची सोय नसल्यामुळे अधिक थकव्यामुळे कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम.

अ समवयस्क मुलांना शाळेत जातांना वा खेळतांना पाहून येणारी उदासिनता व त्यामुळे हरवलेले बालपण.

अ कामाच्या ठिकाणची परिस्थिती प्रतिकूल, त्यामुळे आरोग्यावर होणारा वाईट परिणाम.

अ समाजाकडून मिळणारी वाईट वागणूक.

अ वेतना व्यतिरीक्त सोई–सवलती, सामाजिक सुरक्षिततेचा अभाव,

अ कामाच्या ठिकाणी संरक्षणाचा अभाव. धोकादायक उद्योगात काम केल्याने होणारे शारीरिक दुष्परिणाम.

अ स्वतःसाठी मजुरी खर्च करण्याच्या स्वातंत्र्याचा अभाव.

अ कमी वयात अर्थार्जनामुळे व वाईट संगतीमुळे येणारी व्यसनाधिनता.

अ काम करणाऱ्या एकुण लोकांमध्ये बालमजुरांचे जेवढे प्रमाणे तेवढया संख्येत प्रौढ कामगारांना बेकारीची येणारी पाळी.

बालकामगार प्रथेचे असे अनेक दुष्परिणाम व समस्या दिसून येतात.

बालमजुरी निर्मूलनार्थ उपाय वा तरतुदी –

आपल्या भारतीय समाजामधून बालकामगार प्रथेचे निर्मूलन करायचे असेल तर त्यासाठी एकात्मिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. या प्रयत्नांना पुढील प्रमाणे चार भागात विभाजित करता येते.

अ) घटनात्मक वा संविधानात्मक तरतुदी.

ब) कायदेशीर तरतुदी वा कायद्यांतर्गत उपाय.

क) सरकारी मोहीम वा उपाय.

ड) सामाजिक उपाय.

अ) घटनात्मक वा संविधानात्मक तरतुदी –

भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत सामाजिक न्यायाबाबत म्हटले आहे की, प्रत्येक डोळयातून निघालेले अश्रु मिटणे आणि शोषण थांबविणे आवश्यक आहे. लहानलहान मुलांना शोषण मुक्त करण्यासंबंधी संविधानात प्रावधान आहे.

1. अनुच्छेद 24 मध्ये 14 वर्षा खालील मुलांना कोणत्याही कारखान्यात, खाणीत अथवा धोकादायक उद्योगात काम करण्यास बंदी आहे. मुलांच्या आरोग्याचे रक्षण व्हावे हाच यामागील उद्देश होय.

2. कोवळया मुलांचे शोषणापासून रक्षण व्हावे म्हणून घटनेतील ''नीती निर्देशक तत्वे'' या प्रकरणात ही जबाबदारी शासनावर टाकण्यात आली आहे.

3. अनुच्छेद 39(इ) मध्ये बालकामगारांच्या बाबतीत राज्यांनी पाळावयाची निर्देशक तत्वे दिलेली आहेत.

4. अनुच्छेद 39(क) नुसार बालपण शोषणमुक्त ठेवण्यासाठी संरक्षण देणे आवश्यक ठरते

5. 10 डिसेंबर 1996 ला दिलेल्या निवाडयामध्ये सुप्रीम कोर्टाने बालकामगार समस्ये बाबत कालबध्द कार्यक्रम घेण्याला महत्व दिले आहे. धाकादायक उद्योगांमध्ये कामकरणाऱ्या बालकामगारांच्या व्यवसायांचे नियमन आणि सुधारणा करण्यासाठी मार्गदर्शपर निर्देश दिलेत. त्यामध्ये धोकादायक उद्योगांमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक बालकामगारांच्या मागे 20 हजार रुपये नुकसान भरपाई, बालकामगार व्यवस्थापन आणि कल्याण निधी, त्या कुटुंबातील एका प्रौढ व्यक्तिला बालकामगारा ऐवजी रोजगार किंवा 5 हजार रुपये आर्थिक मदत देण्यात यावी याचा समावेश आहे.

6. भारतीय राज्यघटनेच्या कलम 45 नुसार संविधान लागू झाल्यापासून 10 वर्षाच्या आत 14 वर्षा खालील प्रत्येक बालकाला मोफत आणि अनिवार्य शिक्षण उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न राज्य शासनाने करावेत असे आहे. संविधानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार 14 वर्षा पर्यंत सक्तीचे मोफत शिक्षण दिले गेले तर बालकामगार समस्येला आपोआपच आळा बसू शकेल. हे शिक्षण देत असतांना त्या मुलांचा कल पाहून त्यांना व्यावसायिक शिक्षण दिले गेले तर बेरोजगारी व अकुशलकामगार यांचा प्रश्न सुटण्यास फार मोठया प्रमाणात मदत होईल.

ब)कायदेशीर तरतुदी वा कायद्यांतर्गत उपाय –

भारत सरकारने एका विशिष्ट वयापेक्षा कमी वयाच्या मुलांना रोजगाराकरिता लावले जावू नये म्हणून अनेक कायदे केले आहे.

1.''1938 च्या एम्प्लॉयमेंट ऑफ चिल्ड्रेन ॲक्ट'' नुसार 15 वर्षाखालील मुलांना रेल्वे ट्रान्सपोर्ट, सिमेंट उद्योग, साबण उद्योग, कापड उद्योग, पोर्ट यामध्ये मजुरीवर लावण्यास प्रतिबंध केलेला आहे.

2.1946 मध्ये ''कोळसा अभ्रक कायदा'' संमत करण्यात आला. त्यानुसार कोळसा आणि अभ्रकउद्योगात बालश्रमिक नियुक्तीवर बंदी आहे.

3.1948 मध्ये ''औद्योगिक कायद्या'' नुसार 14 वर्षाखालील मुलांमुलींना मजूर म्हणून घेण्यास प्रतिबंध केला जातो.

4. 1951चा ''प्लॅन्टेशन ऑफ लेबर ॲक्ट '' या कायद्यातील तरतुदी प्रमाणे चहा, कॉफी, रबर इत्यादी मळयांमध्ये बालकामगारांच्या नियुक्तीवर बंदी आहे.

5. 1952 च्या ''माईन्स ॲक्ट'' या कायद्यानुसार 15 वर्षाखालील बालकांना खाणीत काम करण्यास प्रतिबंध करण्यात येतो.

6. 1958 च्या ''मर्चन्ट शिपींग ॲक्ट'' या कायद्यानुसार 15 वर्षाखालील मुलांला शिपींग व्यवसायात काम करण्यास प्रतिबंध केला जातो.

7. 1961च्या ''मोटार ट्रान्सपोर्ट ॲक्ट'' नुसार तसेच ॲप्रंटीस ॲक्ट नुसार 14 वर्षा खालील मुलांस मजुरी करण्यास प्रतिबंध करण्यात येतो.

8. 1962 च्या ''ॲटॉमिक एनर्जी ॲक्ट'' नुसार 18 वर्षाखालील मुलास ॲटॉमिक उत्पादन क्षेत्रात घेण्यावर प्रतिबंध घालण्यात आला आहे.

9. 1966 च्या ''बिडी सिगारेट कामगार अटी कायद्यानुसार'' 14 वर्षे खालील मुलास मजूर म्हणून बिडी सिगारेट उद्योगात कामगार म्हणून घेण्यावर बंदी घालण्यात आली.

10. 1933 चा ''चिल्ड्रन्स स्प्लिडींग ऑफ लेबर ॲक्ट '' 1971 मध्ये संशोधित करण्यात आला. त्यानुसार कामगारांचे वय 15 वर्षापेक्षा कमी नसावे. 15 वर्षापेक्षा कमी वयाच्या बालकाला कामावर घेतल्यास रुपये 200 पर्यंत मालकास दंड व रु. 50 पालकांना दंड आकारला जाईल. अशी तरतुद करण्यात आली..

11. आंतरराष्ट्रीय बालवर्षाची विशेष बाब म्हणजे 1979 चा ''एम्प्लॉयमेंट ऑफ चिल्ड्रन ॲक्ट'' हा कायदा. विशिष्ट अपायकारक उद्योगातील बालरोजगारी प्रतिबंधित करणारा आहे. या मध्ये रेल्वे, बांधकामातील काही क्षेत्र, कॅटरिंग सेवा, राख सफाई, इत्यादी उद्योगांचा समावेश आहे.

12. 1986 च्या ''बालमजूर प्रतिबंध व नियमन'' कायद्यानुसार,

1) बिडी, सिगारेट, सिमेंट, आगपेटया, कापड रंगाई व विणाई, लोकर सफाई तसेच इमारत बांधकाम इत्यादी उद्योगांमध्ये 14 वर्षाच्या आतील मुलांना कामावर लावता येणार नाही.

2) रेल्वे रुळावरुन कोळसा उचलणे, रेल्वेचे दळणवळण, मालाची ने–आण, राख उचलणे, रेल्वे प्लॅटफॉर्मवर खाद्यपदार्थाची विक्री करणे इत्यादी कामांसाठी लहान मुलांना नोकर ठेवता येणार नाही.

3) या कायद्यातील तरतुदीनुसार कोणतीही व्यक्ती, संस्था, कोणताही पोलीस अधिकारी हे या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींच्या विरोधात तक्रार सरळ कोर्टात दाखल करु शकतात.

4) कायद्याने प्रतिबंधित उद्योगात बालमजूर ठेवल्यास त्या मालकाला कमीत कमी तीन महीने सजा व दहा हजार रु. दंड या शिक्षेची तरतूद आहे. दुसऱ्यांदा त्याच व्यक्तीकडून हा अपराध घडल्यास तितका कारावास परंतु दंड मात्र दुप्पट करण्यात येतो.

या कायद्यानुसार 12 वर्षावरील मुलांना संघटित क्षेत्रातील काही उद्योगात काम करण्याची परवानगी देण्यात आली. या कायद्याप्रमाणे किमान वेतन, आरोग्य, शिक्षण, संरक्षण या बाबत काही तरतुदी करण्यात आल्या, परंतू या कायद्याचा तसा फारसा उपयोग नाही. कारण हा कायदा असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या मुलांना लागू नाही. कारण या क्षेत्रात मुलांनी काम करण्यास बंदी आहे. बंदी असली तरी 90 टक्के पेक्षा जास्त मुले असंघटित क्षेत्रात आहेत. या कायद्यान्वये बालकामगारांना काही सीमित क्षेत्रात काम करण्याची सुट देवून एका अर्थाने आपण बालकामगार प्रथेला कायदेशीर मान्यताच दिली आहे.

13. 2 सप्टेंबर 1990 ला बाल हक्कांबाबत युनोची परिषद झाली. याप्रसंगी मुलांच्या हक्काबाबत आंतरराष्ट्रीय कायदा बनविण्यात आला. भारत सुध्दा या कायद्याशी बांधील आहे.

सन 1901 ते 1987 या काळात बालमजूरी प्रतिबंधासंबंधीचे एकूण 22 कायदे अस्तित्वात आले. बालश्रमिक समस्येचे समाधान केवळ कायदे पारीत करुन होऊ शकत नाही ही बाब लक्षात घेवून सरकारने बालश्रम विषयक कल्याण योजना सुरु केल्या.

क) सरकारी उपाय वा बालमजुरी विरोधी सरकारी मोहिम–

बालकामगार समस्येचे निर्मूलन करण्यासाठी शासनाचे विविध कार्यक्रम आखण्यात आलेले आहे. त्यातील काही पुढील प्रमाणे सांगता येतील.

1.बालमजुरीचे उच्चाटन –

राष्ट्राने हे बालमजुरी समस्येचे आव्हान स्वीकारुन बालकामगार प्रतिबंध व नियमन अधिनियम 1986 नुसार बालमजुरीचे उच्चाटन करण्याचे ठरविले आहे.

2. राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प –

शासनाने सातव्या पंचवार्षिक योजनेत बालकामगार धोरण 1987 निश्चित केले. या धोरणात तीन प्रमुख बाबी होत्या.

1) बालकामगार कायद्याची काटेकोर अंमलबजावणी.

2) बालकामगार कल्याण आणि विकास कार्यक्रम राबविण्याचे प्रयत्न.

3) बालकामगारांसाठी बालकामगार प्रकल्प यशस्वीरित्या राबविणे.

या प्रकल्पांतर्गत अनौपचारिक शिक्षणाच्या शाळा, व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र, पुरक आहार योजना इत्यादी रोजगारीतून मुक्त केलेल्या बालकामगारांसाठी सुरु करण्यात आल्यात.केंद्रिय श्रम मंत्रालयाच्या पुढाकाराने 1988 मध्ये राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पाची सुरुवात झाली. पुढे 1995 पासून या प्रकल्पाचा देशात विस्तार झाला. सध्या 19 राज्यातील 267 जिल्हयात बालकामगार प्रकल्प शाळा चालविल्या जातात. एकुण 8,040 शाळांमधून 4 लाख 2 हजार बालकामगार मुले व मुली प्रशिक्षण घेत आहेत. महाराष्ट्रात 18 जिल्हयातील शाळांमधून सुमारे 20 हजार मुले आहेत.

शाळेत येणाऱ्या प्रत्येक बालकामगार मुलाला खाऊसाठी रोज पांच रुपये दिले जात होते. मात्र ऑक्टोंबर 2009 पासून ते बंद झाले. त्याएवजी प्राथमिक शाळांमधून मध्यान्ह भोजन दिले जाऊ लागले. मुलांना दरमहा शंभर रुपये विद्यावेतन दिले जाते. त्यात गेल्या पंधरा वर्षात वाढ झालेली नाही.

देशात अपवाद फक्त कनार्टक सरकारचा आहे. बालकामगार प्रकल्पासाठी श्रम मंत्रालयाकडून मिळणाऱ्या अनुदानाइतकाच निधी कर्नाटक सरकार स्वत देते.

3. बालकामगारांचे सर्वेक्षण –

बालकामगारांच्या पुनर्वसनाकरिता सर्वेक्षण करणे आवश्यक असल्याने त्याकरिता राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातर्फे देशात सर्वत्र बालकामगारांचे सर्वेक्षण केले जाते.

4 बालकामगारांचे पुनर्वसन –

मुलभूत गरजा अन्न–वस्त्र–निवारा, शिक्षण, प्रशिक्षण आरोग्य, मनोरंजन, सामाजिक सुरक्षितता आणि सर्वांगीण विकास या सर्व बाबी बालकांना मिळणे आवश्यक आहे. राष्ट्राचा सुयोग्य नागरिक निर्माण होण्याच्या दृष्टिने बालकागारांचे पुनर्वसन करणे क्रमप्राप्त ठरते व शासनाने त्या दृष्टिने त्यांचे शोषण थांबविण्याचा कार्यक्रम आखला आहे.

5. धोकादायक उद्योगांची यादी –

शासनाने धोकादायक उद्योगांची यादी तयार करुन त्यातून बालकामगारांचे समूळ उच्चाटन करण्याच्या योजना आखल्या आहेत. त्याकरिता शासन कडक उपाय योजित आहेत. असे एकुण 11 उद्योग असून त्यात.

1)बिडी 2) सतरंजी 3)सिमंट 4)कापड छपाई–रंगाई–विणाई 5) आगपेटया, स्फोटक व फटाके 6)अभ्रक 7) लाखेच्या कांडया 8) साबण 9)चामडे कमाई 10)लोकर सफाई आणि 11)बांधकाम या उद्योगांचा समावेश आहे.

धोकादायक व्यवसायात बालकामगारांना काम करण्यास किंवा करायला लावण्यास शासनाची बंदी असूनही आगपेटी कारखाने, खाणी, दगडी पाटया बनविणे, अगरबत्ती, गालीचे बनविणे या कामात आजही बालकांना लावले जाते. एकटया गालीचे तयार करणाऱ्या उद्योगात किमान 2 लाखापेक्षा अधिक मुले वेठबिगारी स्वरुपात काम करतात असा दावा बंधुआ मुक्ती मोर्चाचे महासचिव श्री कैलास सत्यार्थी यांनी केला आहे. त्यांनी या उद्योगातील वेठबिगारीत अडकून पडलेल्या 4500 मुलांची मुक्तता केली असून उर्वरीत मुले मुक्त व्हावीत असा प्रयत्न चालू आहे. परदेशी आयातदारानी मुलांनी केलेले गालीचे स्वीकारले जाणार नाही अशी भूमिका घेतल्यामुळे हे शक्य झाले आहे.

6.प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण –

1968 मध्ये स्वतंत्र भारताने पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहिर केले.

1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानूसार 1995 पर्यंत प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचे उद्दिष्ट ठेवले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या 1992 च्या सुधारित मसुद्यात इ.सन 2000 पर्यंत ही मर्यादा वाढविण्यात आली. या सार्वत्रिकीकरणाच्या कार्यक्रमाची मुलभूत उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

1) वयाची 6 वर्षे पूर्ण झालेले मूल शाळेत दाखल झाले पाहिजे.

2) ते वयाची 14 वर्षे होई पर्यंत शाळेत शिकले पाहिजे.

3) आणि त्याने त्या–त्या इयत्तेच्या अखेरीस असलेली अध्ययन क्षमता संपादन केली पाहिजे.

7. 1995 ची बालश्रमिक नीती –

12 सप्टेंबर 1995 ला त्यावेळचे श्रम मंत्री श्री पी.ए. संगमा यांनी बालमजुरी संबंधी मांडलेली नवी नीती मंजूर करण्यात आली. 1 ऑक्टोंबर 1995 ला ही नीती संपूर्ण भारतभर लागू करण्यात आली. त्या अंतर्गत असलेल्या योजनांसाठी रु. 850 कोटी खर्चाची घोषणा करण्यात आली.

वरीलप्रमाणे बालकामगारांचे शोषण थांबविण्यासाठी शासनाचे प्रयत्न सर्व स्तरावरुन चालू आहेत.

ड) सामाजिक उपाय –

जेव्हा या समस्येबद्दल समाजात अधिक लोकजागृती होईल व ही सामाजिक अनिष्ट प्रथा समूळ नष्ट करण्यास सरकारला सामाजिक संस्था व नागरिक सहयोग देतील तेव्हांच ही समस्या मिटू शकेल. सरकारी प्रयत्नांबरोबरच स्वयंसेवी संघटनांनी सुध्दा ही समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावा. स्वयंसेवी संघटना या कार्यात अधिक चांगले काम करु शकतात ते पुढील प्रमाणे–

1) बालमजुरीच्या विरोधात लोकमत तयार करुन समाजामध्ये चेतना निर्माण करणे.

2) बालमजुरांना जागृत करुन संघटित करणे. डिसेंबर 1994 मध्ये चेन्नई शहरात बालमजुरांचे एक राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आले होते आणि या अधिवेशनात देशातील 12 राज्यातील 1100 बालमजुरांनी भाग घेतला आणि आपल्या मागण्या मांडल्यात व 10 कलमी घोषणापत्र घोषीत पारीत केले. या घोषणापत्रात जीवनावश्यक वस्तू आणि सुविधांचा पुरवठा,मोफत शिक्षण, सुरक्षित काम, संरक्षण आणि निवासी शाळा, लहान मुलांसाठी पाळणाघरे, मारपीट करणाऱ्या पालक मालकांना कडकशिक्षा, बालमजुरी विषयी जागृती, जीवनोपयोगी शिक्षण व सर्वांना मुक्त करण्याची मोहिम पूढे न्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. बालमजुरांना संघटित करण्याचा हा पहिला प्रयत्न होता.

3) शिक्षणाचा अधिकाधिक प्रसार व प्रचार करणे. त्यामुळे अज्ञान, गरिबी व स्वस्त अशिक्षित मजुरांचे चक्रव्युह तुटण्यास मदत होईल. ''गरिबीमुळे अधिक मुले जन्म घेतात, मुलांच्या जन्मामुळे कमावणारे दोन हात वाढतात'' ही धारणा बदलण्यास शिक्षणामुळे मदत होते.

स्वयंसेवी संघटना बालमजुरी मोहिम अंतर्गत अनेक जिल्हयातून बालकामगार मेळावे, बालकामगांर पालक मेळावे, प्रबोधन यात्रा, मोर्चा, धरणे, सत्याग्रह, इ. कार्यक्रम आयोजित करतात.

भारतात बालश्रमिकांच्या कल्याणार्थ अनेक स्वयंसेवी संघटना कार्यरत आहे. या संघटनांना सरकारतर्फे आर्थिक मदत दिली जाते. त्यातील काही संघटनांची नावे व त्या करित असलेली कामे पुढीलप्रमाणे

1) मनोवैज्ञानिक व शिक्षण अनुसंधान संस्था, कलकत्ता –

कार्य – बालमजुरांचे स्वास्थ्य सुधारण्यासाठी व त्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना अनुदान देणे.

2) भारतीय ग्रामीण श्रमिक संस्थान, औरंगाबाद –

कार्य – ग्रामीण तसेच कृषि व्यवसायातून मुक्त केलेल्या मुलांकरिता पूर्व व्यावसायिक प्रशिक्षण व शैक्षणिक केंद्र स्थापन करण्यासाठी अनुदान देणे.

3) कर्नाटक राज्य बालकल्याण परिषद, बंगलोर–

कार्य – काडी कचरा उचलणाऱ्या मुलांच्या कल्याणासाठी योजना राबविण्याकरिता अनुदान देणे

4) स्व–नियोजित महिला असोसिएशन, अहमदाबाद –

कार्य –बालमजुरांच्या पुनर्वसनासाठी अनुदान देणे.

5) आंतरराष्ट्रीय समाज कल्याण परिषद, मुंबई –

कार्य – मुंबईतील काम करणाऱ्या मुलांच्या कल्याण व विकासासाठी कार्य करणे.

6) श्रमिक विद्यापीठ, हैद्राबाद –

कार्य – ग्रामीण बालश्रमिकांना अनौपचारिक शिक्षण देणे

7) भारतीय बालकल्याण परिषद, दिल्ली –

कार्य–दिल्लीच्या रस्त्यांवर काम करणाऱ्या बालकांच्या कल्याणार्थ योजना राबविणे.

8) मध्यप्रदेश स्वैच्छिक कर्मचारी महिला समिती, भोपाळ–

कार्य–काम करणाऱ्या बालकांसाठी सामुदायिक केद्रांची स्थापना करण्यासाठी मदत करणे

अशातऱ्हेने भारतातून बालकामगार प्रथेचे निर्मूलन करण्यासाठी सामाजिक प्रयत्नांची आवश्यकता आहे.

बालमजुरी –पूनर्वसनात्मक उपाय :

मुक्त झालेल्या बालमजुरांसाठी पर्याय काय ?पर्याय नाही म्हणून बालमजुरांना मुक्त करु नये असे म्हणता येईल का ? हा खरा मुलभूत प्रश्न आहे. प्रत्येक वेळी तातडीने पर्याय उपलब्ध असेलच असे नाही. यामुळे पर्याय शोधण्यापेक्षा प्रथम बालमजुरांना विशेषतः धोकादायक काम करणाऱ्या बालमजुरांना प्रथम मुक्त केले पाहिजे व त्यानंतर बालमजुरांच्या पुनर्वसनासाठी अनेक विविध योजना कार्यान्वीत केल्या पाहिजेत.त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1) व्यावसायिक प्रशिक्षण शिक्षण –

बालमजुरीतून मुक्त केलेल्या बालमजुरांसाठी व्यावसायिक प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिली पाहिजे. यासाठी निवासी प्रशिक्षण शाळा असाव्यात. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर बालमजूर तरुण वयात येताच त्यास स्वतंत्र व्यवसाय उद्योग उभारणीसाठी निधी प्राप्त

होण्याची विशष सोय केली पाहिजे.

2) अनौपचारिक / औपचारीक शिक्षणाची संधी –

व्यवसाय प्रशिक्षण काळात अशा मुलांना अनौपचारिक/ औपचारिक शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. त्यासाठी त्यांच्या शिक्षण, निवास, भोजन इ. ची सुध्दा अनिवार्यपणे व्यवस्था केली पाहिजे. तसेच बालकामगार मुलांच्या आई वडिलांना व पालकांना प्रौढ शिक्षणाद्वारे शिक्षित करण्यात यावे.

3) बालमजुरी प्रतिबंधक कायद्याची कार्यक्षम व कडकपणे अंमलबजावणी –

बालमजुरी प्रतिबंध कायद्यांची कार्यक्षम अंमलबजावणी केल्यास बऱ्याच बालमजुरांना लाभ मिळू शकतो. त्यांचे शोषण थांबू शकते. यामुळे त्यांना किमान काही दिलासा मिळेल व अवैधरित्या ज्या उद्योगात बालमजूरांना राबवून घेतले जाते आहे. त्यांची सुटका होवू शकेल . कायद्याच्या कडक अंमलबजावणी सोबतच या कामात सहाय्य करण्यासाठी जिल्हा पातळीवर दक्षता समित्या निर्माण करुन त्यात स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधीत्वाचा समावेश केला पाहिजे. तसेच अशा कायद्यांची माहिती समाजातील सर्व थरातील लोकांपर्यंत पोहचविणे आवश्यक आहे.

4) बालमजुरी प्रतिबंधक सर्वंकष कायदा–

बालमजुरी कायदे सर्वसमावेशक नाहीत. सर्व उद्योग व्यवसायांना लागू होईल असा सर्वंकष बालमजुरी प्रतिबंधक कायदा बनविण्यात यावा. या कायद्याद्वारे बालक वयाची मर्यादा पण किमान 18 वर्ष करण्यात यावी. त्यासाठी शासनाची इच्छा मात्र हवी.

5) सर्वथा मोफत, सक्तीचे व जीवनोपयोगी शिक्षण –

सर्वथा मोफत शिक्षण यांचा अर्थ शिक्षण, शैक्षणिक साहित्य, कपडे, जेवणे, इ. चा त्यात समावेश असावा. ज्यामुळे सामाजातील सामाजिकदृष्टया मागास जाती जमाती व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध होऊ शकेल. मात्र शिक्षण हे आकर्षक, मनाचा ठाव घेणारे, मनोरंजक, आणि जीवनोपयोगी असले पाहिजे. शिक्षणाबरोबरच त्यांच्यात निपूणता निर्माण करणारे व्यावसायिक शिक्षण दिले जावे. त्याशिवाय बाल्यावस्थेतील मुले त्यात रमणार नाहीत. शिक्षणा सोबतच आर्थिक दृष्टया कमकुवत असलेल्या कुटुंबातील मुलामुलींना शिष्यवृत्तीच्या रुपात प्राथमिक स्तरावर काही आर्थिक मदत मिळाली तर पालक त्यांना कामावर न पाठविता शाळेत पाठवतील.

ज्या शिक्षणातून उद्योजक, उत्पादन तंत्र–कौशल्य आत्मसात होईल असे तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाची गरज आहे. शिक्षणासोबत कपडे, अन्न, पुस्तके, आणि आरोगयविषयक सेवा विनामुल्य पुरविण्यात याव्यात की जेणेकरुन पालकांचा दृष्टिकोन बदलून ते आपल्या पाल्यांना शिक्षणाकडे वळवतील.

6) शेतमजुरांसाठी बारमाही कामाची हमी –

शेतमजुरांना वर्षातील फक्त 6 ते 8 महिनेच काम मिळते. हंगाम संपताच शेतमजूर इतर कामासाठी स्थलांतरित होतात. त्यांच्याबरोबर त्यांची मुलेही स्थलांतरित होतात व परिणामत त्यांचे शिक्षण बंद होते. त्यामुळे शेतमजुरांसाठी रोहयोने आपली कार्यक्षमता वाढवून 'बारमाही' कामाची हमी दिली पाहिजे.

7) शेतमजुरांच्या किमान वेतनात वाढ –

कुटुंब सतत दारिद्रय रेषेखाली राहणार नाही इतपत किमान वेतन निश्चित केले जावे. निदान वाढत्या महागाई निर्देशांकाप्रमाणे किमान वेतनात वाढ करण्यात यावी. परिणामत अर्थाजनासाठी ते आपल्या मुलांना कामाला जुंपणार नाहीत.

8) पाळणाघराची सोय –

केवळ लहान भावंडाना सांभाळण्याच्या कारणासाठी लाखो मुले विशेषत मुली शिक्षणापासून वंचित राहतात. त्यामुळे शाळा तिथे पूर्णवेळ पाळणाघर कार्यक्रम शासनाच्या वतीने कार्यान्वीत करण्याची गरज आहे. तसेच छोटया कुटुंबाची संकल्पना रुजविणे आवश्यक आहे.

9) अत्यावश्यक गरजांची पूर्तता –

निवारा, पिण्याचे पाणी, वीज, शिक्षण आणि आरोग्य सुविधा या अत्यावश्यक गरजांच्या अभावी कौटुंबिक जीवनावर विपरीत परिणाम होतो. हया सुविध उपलब्ध करुन दिल्या जाणे आवश्यक आहे.

10) इतर आवश्यक उपाय योजना –

असंघटित क्षेत्रातील मजुरांना विशेषत घरेलू कामगारांना विविध योजनांचा लाभ मिळणे आवश्यक आहे. कामगारांना ओळखपत्र देणे, अपघात सहाय्य मुलांच्या शिक्षणास आर्थिक सहाय्य, प्रशिक्षणे,राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना, बचतगटांशी संलग्न करणे, विविध विमा योजना आदी लाभ देण्यात यावे यामुळे त्यांच्या स्थितीत सुधारणा होऊन ते आपल्या पाल्यांना अर्थार्जनासाठी कामाला लावणार नाहीत.

समारोप –

बालमजुरांचे पूनर्वसन आणि निर्मूलनासाठी समाजातील विविध घटकांचा सहभग असल्याशिवाय उद्दिष्ट प्राप्ती होऊ शकणार नाही. त्यासाठी शासनाची भूमिका सर्वाधिक महत्वाची आहे.

बालमजुरी पुनर्वसन व निर्मूलन ही लोक चळवळ बनली पाहिजे. यात सर्वाधिक महत्वाची भूमिका स्वयंसेवी संस्था संघटना बजावू शकतात. लोकजागृतीसाठी अनेकविध कार्यक्रम सातत्याने संगठीतपणे आयोजन करणे व शासकीय योजना कार्यान्वीत करण्यास सहकार्य करणे या बाबी स्वयंसेवी संस्थांकडून अपेक्षित आहेत.

राजकीय पक्षांनी सुध्दा बालमजूरी निर्मूलन कार्यक्रमाकडे एक अत्यावश्यक कार्यक्रम म्हणून पाहिले पाहिजे.बालकामगार ही दुष्ट प्रथा नष्ट करुन लहान बालकांच्या सर्वांगीण विकासात समाजाने हातभार लावावा याशिवाय समाजातील विद्वांन व विचारवंत मंडळीनी याप्रश्नी प्रबोधनाची भूमिका घेतली तर ही चळवळ पूढे जाण्यास एक चांगला आधार तयार होऊ शकतो. यामुळे बालकामगारांचे पालक व मालक दोघेही प्रबोधीत होऊ शकतात.

बालकामगार प्रथा नाहिशी व्हावी यासाठी अनेक प्रयत्न होत आहेत. पण हा सुटा प्रश्न नाही. असंघटित प्रौढ कामगारांच्या प्रश्नातून तो उद्‌भवलेला आहे. असंघटित क्षेत्रातील किमान वेतनाची पायमल्ली, राजगाराची अशाश्वती असुरक्षितता आणि अस्थैर्य हेच बालकामगार प्रथेच्या मुळाशी आहे. अपुऱ्या आणि अनिश्चित रोजगारामुळे घरातील सर्व माणसं कामासाठी बाहेर पडतात.आणि छोटी मोठी जोड देवून कसेबसे घर चालवतात. बालकामगार प्रथा नष्ट करणे एकांगी मोहिमेतून काहीच साधणार नाही. मूळ रोगावर उपचार व्हावयास हवेत. असंघटित प्रौढ कामगारांचे प्रश्न मार्गी लागले तरच या मोहिमांना काही अर्थ प्राप्त होईल.

बालश्रमिकांच्या रोजगाराची स्थिती सुधारणे आणि दुसऱ्या बाजूने बालश्रमिक निर्माण होणार नाही यादृष्टीने प्रयत्न करणे अशी दुहेरी उपाययोजना आवश्यक आहे. पंरतू त्या करिता गरज आहे ती एकात्मिक सामाजिक प्रयत्नांची आणि ते प्रयत्न प्रामाणिकपणे राबविण्याची.

संदर्भ सूची

1) G.S. Pande- Constitutional law of India" Pg. No. 180,215,216

2) डॉ दि.व्यं.जहागिरदार–आर्थिक जगत, खंड 1, पृष्ठ 71

3) ''ICCW News Bulletin" Feb. 1982, Vol XXX No. 2 Laws relating to child labour , Pg. No. 9,

4) ॲड श्री श्री.नि.सबनीस – बालकांबाबत न्याय अधिनियम 1986

5) Badiwala Nitesh- 'Child Labour in India : Causes, Government Policies and the role of Education, P-2'

6) India 1999

7) श्री देवराम बोरूडे –योजना,ऑक्टोंबर 1998, बालकामगार समस्या व उपाय,
पृष्ठ 12 ते 14
8) प्रा. देशमुख के.बी. –योजना , जुन 1996
9) Abolition of Child labour in India-strategies for the Eleventh Five Year Plan.
10) National Child Labour Project (NCLP)
11) Indo-US child labour project (INDUS)
12) श्री गोजमे मच्छिंद्र – भारतातील बाल कामगार समस्या